| | |
|---|---|
| MHKO030079382019 | **समरी क्रिमिनल केस क्र.५६६९/२०१९**<br>**मधील निशाणी क्र.१० वरील आदेश**<br>**महाराष्ट्र सरकार विरुध्द अश्वीनी महेश दिक्षीत** |

सदरचा अर्ज हा आरोपी क्र.१ ने पासपोर्ट कायदा कलम ५ व ६ प्रमाणे नाहरकत दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. आरोपी क्र.१ ने सदर अर्जाद्वारे अशी विनंती केली आहे की, आरोपी क्र.१ या कोल्हापूर येथील कायमस्वरुपी रहिवाशी असून त्या शिक्षिका असून नोकरी संदर्भात त्यांना (UK) येथे जाण्याचे असून त्यांनी पासपोर्ट कार्यालयात पासपोर्ट मिळणेकरीता अर्ज दिला आहे. सदर प्रकरण या न्यायालयात प्रलंबित असून ते गुणदोषावर चालण्यास बराच दिनावधी लागणार आहे. आरोपी क्र.१ विरुध्द मे.कोर्टात कोणत्याही गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल नाही. आरोपी क्र.१ हया जुलै-सप्टेंबर हया कालावधीत फक्त ३० दिवसांसाठीच परदेशात जाणार असून परदेशातील काम संपल्याबरोबरच लगेच भारतात येवून सदर केसमध्ये हजर राहतील. आरोपी क्र.१ हया नोकरीस जावू शकल्या नाहीत तर त्यांचे तसेच त्यांच्या कुटूंबियांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. आरोपी क्र.१ हया कोठेही पळून जाणार नाहीत. सदरचा अर्ज नामंजूर झालेस आरोपी क्र.१ यांचे अपरिमित कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी सदरचा अर्ज मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

३. सदर अर्जास सरकारी वकिलांनी असे म्हणणे दाखल केले आहे की, सदरचे काम चौकशीवर नेमले असून आरोपी यांना पासपोर्ट दिलेस व आरोपी क्र.१ या परदेशी गेल्यास काम चालविताना अडचण निर्माण होणार आहे. आरोपी यांचा सदर कामी असलेले गुन्हयात सहभाग असल्याचे दिसून येते. तरी सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. दोन्ही वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. सदरचे प्रकरण हे आरोपी क्र.२ हजर होण्यावर नेमले आहे. सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे आरोपी क्र.१ हया जुलै-सप्टेंबर हया कालावधीत फक्त ३० दिवसांसाठीच परदेशात जाणार असून परदेशातील काम संपल्याबरोबरच लगेच भारतात येवून सदर केसमध्ये हजर

राहतील असे कथन केले आहे. आरोपी करीता विद्वान वकिल यांनी विनंती केली की, आरोपीच्या गैरहजेरीत ते कामकाज चालविण्यास तयार आहेत. करीता अर्जातील नमूद कारणावरुन सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे -

**आदेश**

१. निशाणी १० कडील अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येतो. आरोपीने नियमाप्रमाणे पासपोर्टकरीता सर्व अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास केवळ सदरचे प्रकरण प्रलंबित असल्याने केवळ या प्रकरणात आरोपीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र.१ यांनी वेळोवेळी व जेव्हा सदर प्रकरणात गरज असेल तेव्हा हजर रहावे. आरोपी क्र.१ च्या गैरहजेरीच्या काळात त्यांचे विधिज्ञ यांनी सदर प्रकरणाचे कामकाज नियमानूसार पहावे.

३. आरोपी क्र.१ यांनी (UK) येथील त्याचा रहिवाशी पत्ता व फोन नंबर तसेच रहिवासिचा कालावधी याबाबत संपूर्ण माहिती दयावी. तसेच आरोपी क्र.१ हिचा सध्याचा पत्ता, फोन नंबर याची संपूर्ण माहिती दयावी.

४. आरोपी क्र.१ हिने (UK) येथून परत आल्यानंतर सदर प्रकरणात नियमाप्रमाणे हजर रहावे.

SHILPA VISHVESH KULKARNI

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2025.02.18 16:18:01 +0530

**ठिकाण - कोल्हापूर** **(एस.व्ही.कुलकर्णी)**
**दिनांक -१८/०२/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोर्ट नं.१६, कोल्हापूर**